फिर्यादी प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भोकर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0571 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**23/10/2026 02:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिंनाक पासून):** 22/10/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 22/10/2026

**Time From (वेळेपासून):** 16:13 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 23/10/2026 **Time (वेळ):** 01:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 23/10/2026 01:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भोकर येथील पंचायत समिती ,कार्यालयाचे समोर वडारगल्ली येथ,खाजगी कार्यालयात ता भोकर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती प्रिती रमेशराव जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधकविभागनादेड,नांदेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिंबधकविभागनादेड,नांदेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8381041809

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साहेबराव हैबती टोमके | | | 1. रा गंदेवार कालनी, ता भोकर , भोकर,भोकर,नांदेड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/ रू स्वता: | 5,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | स्विकारली. | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिंनाक 23/10/2026

मी प्रिती रमेशराव जाधव, वय 37 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8381041809.

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड युनिट येथे सन 2023 रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस आहे.

आम्ही दिंनाक 22/10/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकृष्ण कोकाटे सर, यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून कळविले की, तक्रारदार उत्तम बद्दु राठोड, वय 63 वर्ष, व्यवसाय शेती, रा. चिदगिरी, ता. भोकर, जि. नांदेड यांची लोकसेवका विरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत तोंडी आदेश दिले.

त्यानंतर आम्ही मुळ तक्रारदार उत्तम बद्दु राठोड यांना तक्रारीबाबत विचारपुस केली असता, त्यांनी सांगितले की, ''मौजे चिदगिरी, ता. भोकर, जि. नांदेड येथील शेत गट क्रं. 290 मध्ये माझी मयत पत्नी नामे कै. सुमन उत्तम राठोड यांचे नावे क्षेत्र 80 आर शेत जमीन आहे. नमुद शेती जमीन माझे नावे करण्यासाठी दिंनाक 21.10.2026 रोजी मी मौजे चिदगिरी गावाचे तलाठी श्री. टोमके यांचेकडे भोकर येथील पंचायत समिती कार्यालयाचे समोर वडारगल्ली येथील असलेल्या खाजगी कार्यालयात जावुन त्यांना विंनती केली की, माझी मयत पत्नी नामे कै. सुमन उत्तम राठोड यांचे नावे असलेल्या मौजे चिदगिरी ता. भोकर जि. नांदेड येथील शेत गट क्रं. 290 मधील क्षेत्र 80 आर शेती माझे नावे करावयाची आहे, असे मी म्हणालो, त्यावर तलाठी श्री टोमके यांनी 500/- रू चे बाॅन्ड वर वारसदाराचे संमतीपत्र घेवुन या असे सांगितले व त्यासोबत तुम्हाला तुमच्या नावे जमीन करण्यासाठी 12,000/- रू खर्च येईल? असे सांगीतले व आत्ता खर्च पाण्यासाठी लागतात म्हणुन माझेकडुन 1,500/- रू नगदी घेतले.

त्यावर तक्रारदार यांनी सदरचे पैसे कशाला लागतात फिस वगैरे काही नसते असे म्हणाल्यावर त्यांनी मला पैसे दिले तरच काम करून देतो असे म्हणाले. तलाठी टोमके मागत असलेले 12,000/- रू लाच असल्याची त्यांची खात्री झाल्याने तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिंबधक विभागास समक्ष येवुन तलाठी टोमके यांचेविरूध्द योग्य ती कारवाई करावी अशी आशयाची तक्रार दिली होती.

प्राप्त तक्रारी वरून आम्ही दिंनाक 22/10/2026 रोजी गोपनीय कामाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद नांदेड यांना लेखी पत्र देवून तेथील दोन शासकीय पंच 1) ऋषीकेश यशवंतराव शिंदे, वय 30 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद कनिष्ठ सहाय्यक लेखा, नेमणुक वित विभाग, जिल्हा परिषद, नांदेड, व पंच क्रमांक 2) शाम नामदेव लामतुरे, वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद कनिष्ठ सहाय्यक, नेमणुक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड असे पंच कर्मचारी उपलब्ध करून घेतले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक, दोन्ही पंच व तक्रारदार असे शासकीय वाहनाने सापळा कारवाई करीता लागणा-या सर्व साहित्यासह लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड येथून भोकर करीता रवाना झालो. भोकर येथे येवुन भोकर ते तामसा रोडवर दिंगाबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर लगत रोडवर जावून सुरक्षीत स्थळी थांबलो. तेथे आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकाची एकमेंकाना ओळख करून दिली. तसेच तक्रारदार यांनी आमच्याकडे नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारी बाबत थोडक्यात हकीकत सांगून दोन्ही पंचाना तक्रार वाचण्यास दिली. पंचानी तक्रार

वाचून त्यावर सहया केल्या.
त्या ठिकाणी आमचे सुचनेवरुन पोहेका◌ॅ/बालाजी मेकाले यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅ
ड
र, मेमरी कार्ड बाबत थोडक्यात माहिती देवून एका नविन मेमरी कार्ड मध्ये आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली की, लोकसेवक टोमके हे कुठे भेटतील? तेव्हा त्यांनी कळविले की, आज बाजार असल्याने ते पंचायत समिती कार्यालयाचे समोर वडारगल्ली येथील असलेल्या त्यांचे कार्यालयात भेटतील. तेव्हा आम्ही तक्रारदार यांची लाच मागणी पडताळणी करण्याचा निणय घेवून पंच क्रमांक 1 व 2 यांची जबाबदारी निश्चित केली.
त्यानंतर तक्रारदार उत्तम राठोड व पंच क्र. 1 ऋषीकेश शिंदे असे दोघांना तक्रारदार यांचे जवळील मोटार सायकल क्रमांक एम.एच. 26 पी.व्ही. 3049 ने वेळ 15.41 वा. पंचायत समिती कार्यालयाचे समोर वडारगल्ली येथील असलेल्या तलाठी टोमके यांचे कार्यालयात त्यांची भेट घेण्यासाठी डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅ
ड
र चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा वरून रवाना केले. वेळ 15.57 वाजता त
त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितले की, तलाठी टोमके यांचे कार्यालयासमोर गेले असता कार्यालय बंद होते. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9881821788 वरून तलाठी टोमके यांचे मोबाईल क्रं. 9423139665 वर का◌ॅल करून स्पीकर ऑन करून बोलले की, मी उत्तम राठोड बोलत आहे. माझे कामासाठी तुमच्या ऑफीसला आलो होतो, त्यावर तलाठी टोमके म्हणाले मी इलेक्शन मध्ये आहे, पदवीधर इलेक्शन मध्ये आहे, व लगेच फोन कट झाला, तक्रारदार यांनी पुन्हा टोमके यांना फोन केला असता टोमके यांनी मी अर्ध्या तासात ऑफीसला येतो असे म्हणाले. असे तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतले.
त्यानंतर तक्रारदार उत्तम राठोड व पंच क्र. 1 ऋषीकेश शिंदे असे दोघांना तक्रारदार यांचे जवळील मोटार सायकल क्रमांक एम.एच. 26 पीव्ही 3049 ने वेळ 16.13 वा. पंचायत समिती कार्यालयाचे समोर वडारगल्ली येथील असलेल्या तलाठी श्री. टोमके यांचे कार्यालयात त्यांची भेट घेण्यासाठी डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅ
ड
र चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा वरून रवाना केले. वेळ 16.35 वाजता त
त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितले की, ''आम्ही त्यांचे कार्यालयात गेलोत तेव्हा तलाठी टोमके हे कार्यालयात हजर होते, तेथे गेल्यावर तक्रारदार यांनी नमस्कार टोमके साहेब म्हणाले, त्यानंतर तक्रारदार म्हणाले की, तुम्ही सांगीतल्याप्रमाणे बा◌ॅन्ड घेवुन आलो आहे. माझे काम होण्यासाठी किती दिवस लागेल 8 दिवस, त्यावर टोमके म्हणाले ''15 दिवस, पैसे देवुन टाका,'' तक्रारदार म्हणाले किती, टोमके म्हणाले ''सांगलो की तवाच, '' तक्रारदार काही म्हणले नाही, टोमके म्हणाले ''तुमच्या देखत सांगलो 12,000/- रू.,'' तक्रारदार म्हणले 12,000/- म्हणले, टोमके म्हणाले '' हं...काय म्हणल्या मंग, किती देता'' तक्रारदार म्हणाले आत्ता 5,000/-देतो नंतर दोन तीन दिंवसात उरलेले 7,000/-रू देतो. परिस्थीती बेकार झाली ओ साहेब तिन-चार लाख रुपये गेले दवाखाण्यामध्ये, दवाखाण्यात पैसा गेला लय.., तवा दिलो की, दिड हजार वारसा न करायच होत. आत्ता पाच हजार देतो ऐकुन घ्या माझ सात हजार नंतर तुम्हाला दोन-चार दिवसान आणून देतो. त्यावर लोकसेवक टोमके म्हणाले की, ''किती वेळ लागते किती वेळ लागते यायला'' त्यावर तक्रारदार यांनी दहा मिनीट थांबा जावुन घेवुन येतो. असे म्हणुन वेळ घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक टोमके यांचे भेटी दरम्यान डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅ
ड
र मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हा◌ॅईस
लोकसेवक टोमके यांनी तक्रारदार उत्तम राठोड यांचे पत्नी नामे कै. सुमन उत्तम राठोड यांचे नावे असलेल्या मौजे चिदगिरी ता. भोकर जि. नांदेड येथील शेत गट क्रं. 290 मधील क्षेत्र 80 आर शेती त्यांचे नावे करण्याकरीता 12,000/- रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/- आत्ता लगेच व उर्वरीत 7,000/- रू दोन

तीन दिंवसानी स्वतः स्वीकारण्याची तयारी दर्शविली. म्हणुन लोकसेवक टोमके यांचे विरूध्द लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेकडील 5,000/- रुपये रक्कम (ज्यात 500/- रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा ) पंचासमक्ष हजर केल्या. त्या नोटांचा तपशिल एका कागदावर नोंदवून घेतला. त्यानंतर पोका◌ॅ/विनयकुमार नुकलवार यांनी लाच रक्कम 5,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या खिश्यामध्ये अलगद ठेवून दिली.

त्यानंतर पोहेका◌ॅ/बालाजी मेकाले यांनी तक्रारदार यांचे गळ्यात डिजीटल व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
र चालू करून गळ्यात अडकवले व तक्रारदार व पंच क्र. 1 ऋषीकेश शिंदे यांना तक्रारदार यांचे मोटार सायकलने 16.56 वा

त्यानंतर आम्ही लोकसेवक पंच क्रमांक 1 यांना विचारणा केली की, तक्रारदार यांचेकडून स्वीकारलेली लाचेची रक्कम कुठे ठेवली आहे ? त्यावर त्यांनी सांगितले की, नमुद लाचेची रक्कम तलाठी टोमके यांनी टेबलावर ठेवायला सांगीतली होती, तेव्हा आम्ही लोकसेवकाचे टेबलची पाहणी केली असता टेबलावर अँथ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम मिळून आली. ती पंचाकरवी हस्तगत करून ताब्यात घेवून नोटांचे क्रमांकाची पडताळणी केली.

लागलीच लोकसेवक टोमके यांचे दोन्ही हाताला अँथ्रा◌ॅसीन पावडर आहे याची अल्ट्राव्हायलेट लॅम्प मध्ये पाहणी केली असता त्यांचे उजव्या व डाव्या हाताच्या तळहातावर तसेच बोटावर अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसून आली.

त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 1 यांना सापळा कारवाई दरम्यान काय घडले अशी विचारणा केली असता, त्यावर पंच क्रमांक 1 यांनी आम्हास कळविले की, मी व तक्रारदार उत्तम राठोड असे तलाठी टोमके यांचे कार्यालयाकडे गेलो असता, तलाठी टोमके हे त्यांचे कार्यालयाचे बाहेर उभे होते. तेव्हा आम्ही दोघे कार्यालयातील बाकडयावर बसलोत, तेव्हा तक्रारदार लोकसेवक टोमके यांना म्हणाले की, आणले, मोजुन घ्या की, त्यावर टोमके यांनी टेबलाकडे इशारा करत ठेवाना, ठेवाना टेबलावर असे म्हणाले, त्यावरून तक्रारदार यांनी त्यांचे जवळील अँथ्रासिन पावडरयुक्त 5,000/-लाचेची रक्कम टेबलावर ठेवली. लोकसेवक टोमके यांनी तक्रारदार यांना त्यांचे जवळील अँथ्रासिन पावडरयुक्त 5,000/-लाचेची रक्कम टेबलावर ठेवण्यास सांगुन ती स्वीकारली आहे. त्यानंतर लोकसेवक टोमके यांना पुढील कारवाई करीता ताब्यात घेवुन सापळा पथकासह पोलीस स्टेशन भोकर करिता रवाना झालो.

आरोपी लोकसेवक साहेबराव हैबती टोमके, वय 53 वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सज्जा चिदगिरी, ता. भोकर, जि. नांदेड यांनी तक्रारदार उत्तम राठोड यांचे पत्नीचे नावे असलेल्या मौजे चिदगिरी, ता. भोकर, जि. नांदेड येथील शेत गट क्रं. 290 मधील क्षेत्र 80 आर शेती तक्रारदार यांचे नावे करण्यासाठी 12,000/- रूपयाची लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 5,000/- आत्ता लगेच व उर्वरीत 7,000/- रू दोन तीन दिंवसानी स्वतः स्वीकारण्याची तयारी दर्शविली. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडून अँथ्रासिन पावडरयुक्त 5,000/- रूपय लाचेची रक्कम स्वतः स्वीकारल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून यातील आरोपी लोकसेवक साहेबराव हैबती टोमके यांचे विरूध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे माझी कायदेशिर फिंयाद आहे.

हीफिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VISHWAMBHAR ARJUNRAO PALLEWAD(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.भोकर

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VISHWAMBHAR ARJU
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):